**कै. श्री.सोमनाथ सीताराम  धुमाळ तथा दादासाहेब कासार**

**वकिल, मालेगाव (जिल्हा: नाशिक)**



| नाव : | **कै. श्री.सोमनाथ सीताराम  धुमाळ तथा दादासाहेब कासार वकिल** |
|---|---|
| जन्मतारीख  : | दि.०९/१०/१९०५ |
| मृत्यू  : | दि.२६/०४/१९९३ रोजी  वयाच्या ८७ व्या वर्षी. |
| जन्मठिकाण : | मालेगाव. |
| शैक्षणिक तपशील: | एम.ए.फिलॉसॉफी (तत्वज्ञान) प्रथम श्रेणीत प्रथम  आणि  एल. एल. बी.. |
| शालान्त परीक्षा  : | मालेगावच्या प्राथमिक शिक्षणानंतर त्यांना पुढील शालान्त परिक्षेपर्यंतच्या शिक्षणासाठी बैलगाडीने धुळ्याला जावे लागत असे. शालान्त परीक्षेनंतर तीन वर्षे त्यांनी वडिलांच्या तांबे व पितळेच्या भांड्यांच्या व्यवसायात वडिलांबरोबर काम केले. पण त्यांच्या शिक्षणाच्या आवडीमुळे त्यांनी घर सोडून पुढील शिक्षणासाठी पुणे गाठले (एम.ए., एल. एल. बी. साठी). |
| उच्च माध्यमिक शिक्षण : | एम.ए. (तत्वज्ञान) - एस. पी. कॉलेज, पुणे.<br>एल. एल. बी. - लॉ.कॉलेज, पुणे. |
| ज्ञात भाषा : | मराठी, हिंदी, इंग्लिश, संस्कृत. |
| खास रुची : | धर्मग्रंथांचा अभ्यास, उत्तमोत्तम पुस्तकांचा संग्रह करणे, सत्संगाची आवड. |
| एम.ए.च्या शोधनिबंधाचा विषय: | संत तुकाराम महाराजांच्या जीवनातील गूढवाद. |
| नौकरी  : | तत्वज्ञानाचे प्राध्यापक म्हणून डेक्कन कॉलेज पुणे येथे अंदाजे  एक वर्ष. |
| वकील म्हणून व्यवसाय : | त्यांनी  १९३३  साली  मालेगाव येथे वकील म्हणून आपली कारकीर्द सुरू केली  आणि १९८०  सालापर्यंत काम केले (एकूण ४७ वर्षे . आपल्या आयुष्याची ७५ वर्षे पूर्ण केल्यावर, त्यांनी वकील म्हणून सक्रिय कारकीर्द थांबविली, परंतु आपल्या अशिलांना विनामूल्य कायदेशीर सल्ला देणे चालू ठेवले.  जेव्हा अशिलांनी शुल्क घेण्याचा आग्रह धरला, तेव्हा ते  त्यांना त्यांच्या इच्छेनुसार देणगी बॉक्समध्ये (टेबलवर  ठेवलेल्या) रक्कम ठेवण्यास सांगायचे. नंतर त्यांनी देणगी पेटीत जमा केलेली रक्कम “वनवासी कल्याण आश्रम” च्या सामाजिक कार्यासाठी दान केली.  त्यांनी कायद्याच्या तसेच धार्मिक, शैक्षणिक आणि तत्व्यज्ञानाच्या पुस्तकांचे खूप चांगले ग्रंथालय तयार केले होते. जेव्हा जेव्हा एखाद्या खटल्यासाठी वाद व्हायचे तेव्हा त्यांची तीव्र धारदार ग्रहणशक्ती आणि कुशाग्र बुद्धीमत्ता नेहमीच अनुभवली जात असे. जेव्हा ते एखाद्या खटल्यामध्ये आपली बाजू मांडायचे किंवा उलटतपासणी करायचे तेव्हा न्यायाधीश, त्यांचे अशील आणि न्यायालयातील |

| | |
|---|---|
| | उपस्थित सर्वजण त्यांच्या बोलण्याकडे बारकाईने लक्ष देत असत. ते त्यांच्या खटल्यांचा संपूर्ण संक्षिप्त तपशील (टिपणे) आणि महत्त्वाचे मुद्दे "मोडी" लिपीत त्याच्या ब्रीफकेसमध्ये तयार ठेवत असत. ज्या न्यायाधीशांपुढे त्यांनी काम केले होते, त्या न्यायाधीशांनी त्यांच्याकडून बऱ्याच गोष्टी शिकल्या. वकिलांनी कायद्याचा सखोल अभ्यास केल्यावरच अशिलाला कायदेशीर बाबींमध्ये सल्ला द्यावा, असा त्यांचा नेहमीच आग्रह असे. ***साधेपणा, स्पष्टवक्तेपणा, आणि सभ्यता* हे त्यांचे मुख्य गुण होते**. ते नेहमी म्हणायचे की "जेव्हा वकील उत्तम न्यायाधीशांसमोर आपली प्रकरणे सादर करतात तेव्हा वकिलांच्या कामाची गुणवत्ता वाढते आणि न्यायाधीश चांगल्या वकिलांची प्रकरणे चालवितात तेव्हा न्यायाधीशांच्या कामकाजाची गुणवत्ता वाढते." असे तत्कालीन वकील म्हणत. |
| समाजकार्य: | - मालेगाव एज्युकेशन सोसायटी आणि झुं.प.काकाणी विद्यालय यांच्या स्थापनेत त्यांनी सक्रिय सहभाग घेतला.<br>- व्यायामाबद्दलच्या आवडीमुळे भगवंत व्यायाम शाळा, मालेगावशी ते संबंधित असायचे.<br>- काकाणी वाचनालयाचे (ग्रंथालय) अध्यक्ष म्हणून त्यांनी काम केले.<br>- त्यांच्या कासार समाजाचे अध्यक्ष म्हणून त्यांनी बरीच वर्षे काम केले. केवळ मालेगावच नव्हे तर नागपूर ते कोल्हापूर असे महाराष्ट्रभर समाज कार्यासाठी ते स्वखर्चाने फिरत असत व समाजबांधवांच्या समस्या सोडवित असत.<br>- मालेगाव येथील लॉ कॉलेजमध्ये ७ -८ वर्षे कायद्याचे विषय शिकविले. त्यांनी विधी महाविद्यालयात सर्वात जास्त विद्यार्थीप्रिय प्राध्यापक म्हणून मानाचे स्थान मिळविले.<br>- दादांनी मालेगाव येथे सन.१९३९ पासून राष्ट्रीय स्वयंसेवक संघा (आर. एस. एस) साठी काम करण्यास सुरवात केली. त्यांच्या मृत्यूपर्यंत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ते शहर संघ चालक होते.<br>- दादांना सन.१९४८ साली महात्मा गांधींच्या हत्येनंतर आर.एस.एस. मध्ये सक्रिय असण्यामुळे आठ महिन्यांसाठी तुरूंगात टाकले गेले होते.<br>- सन.१९७५ मध्ये आणीबाणीच्या वेळी दादांना पुन्हा एकदा तुरुंगवासाची शक्यता होती, परंतु मालेगावच्या एका तत्कालीन मंत्रिमहोदयांनी त्यांना मुक्त ठेवले तर शांतता अजिबात धोक्यात येणार नाही, असे पत्र सादर केल्यानंतर पोलिसांनी त्यांना अटक केली नाही. मालेगावातील जातीय दंगलीं दरम्यान आणि नंतर हिंदु व मुस्लिम बांधव यांच्यात शांतता प्रस्थापित करण्यात दादा बहुतेक वेळेला सक्रिय असायचे (त्यांचे बहुसंख्य अशील मुसलमान असल्यामुळे).<br>- विश्व हिंदू परिषद, गायत्री परिवार, हरिद्वार तसेच प्रजापिता ब्रम्हाकुमारी परिवाराशीही त्यांचा जवळचा संबंध होता.<br>- वकिली कामाच्या प्रचंड व्यापातूनही वेळ काढून भारतातील चारी धाम यात्रा |

| | |
|---|---|
| | तसेच प्रसिद्ध धार्मिक स्थळांना सपत्नीक भेटी दिल्या.<br>- दादांनी दैनंदिन अध्यात्मिक साधनेमुळे अध्यात्मामध्ये उच्च पदापर्यंत प्रगती केली होती. |
| कुटुंब : | - त्यांची सहचारिणी सौ.शांताबाई धुमाळ यांनी संपूर्ण हयातभर त्यांना यशस्वी साथ दिली. पाहुण्यारावळ्यांची, नात्यागोत्यांची तसेच संघाच्या प्रचारकाची काळजी एका कर्त्या स्त्रीप्रमाणे, मातेप्रमाणे घेतली.<br>- स्वतः च्या परिवाराबरोबरच त्यांनी स्वतःच्या दोन विधवा बहिणींच्या, त्यांच्या मुलाबाळांच्या, तसेच दोन भावांच्या मुलांचाही सांभाळ केला व त्यांना त्यांच्या पायावर उभे केले. त्यामुळे कुटुंबातच नाही तर संपूर्ण गावात, समाजात त्यांना **दादा** व त्यांच्या पत्नीला लोक **वहिनी** म्हणू लागले.<br>- सहा मुली व दोन मुले.<br>- दादांचा वडील मुलगा पद्माकर याने न्यायाधीश म्हणून काम केले (१९७४ ते २००१) आणि अति.जिल्हा व सत्र न्यायाधीश या पदावरून निवृत्त झाले व आता नाशिकमध्ये शांततापूर्ण जीवन जगत आहेत.<br>- दुसरा मुलगा अनिल याचे नाशिक येथे औद्योगिक व्यवसाय असून त्याचा व्यवसाय हा पोल्ट्री इंडस्ट्रीमध्ये बाजारपेठेतील अग्रगण्य नाव असून देशांतर्गत व परदेशी ग्राहकांसमवेत तो अजूनही व्यवसायात सक्रिय आहे.<br>- दादांच्या एका मुलीने (डॉ. हिरा आहेर) तिचे शिक्षण पीएचडी पर्यंतच्या पदव्या घेऊन पूर्ण केले आहे आणि नागपूर विद्यापीठाच्या बी.एड. महाविद्यालयाच्या प्राचार्या म्हणून त्या काही वर्षांपूर्वी निवृत्त झाल्या आहेत.<br>- त्यांचे एक जावई (श्री. आर. एल. भिंगे) हे महाराष्ट्राचे पोलिस महानिरीक्षक होते.<br>- आणखी एक जावई (श्री. बलराज आहेर) नागपूर विद्यापीठाचे कुलसचिव म्हणून कार्यरत होते.<br>- दादांचे अजून एक जावई (श्री. पी.एल.भिंगे )यांनी स्टील ऑथॉरिटी ऑफ इंडिया लिमिटेड या सरकारी कंपनीमध्ये बरेच वर्ष काम केलेले असून त्यांची मुले नाशिक येथे औद्योगिक व बांधकाम क्षेत्रात सक्रिय आहेत व एक मुलगा यु.एस.ए. येथे पर्यावरण अभियांत्रिकी क्षेत्रात कार्यरत आहे.<br>- त्यांच्या इतर जावयांनीसुद्धा विविध सरकारी आणि खासगी संस्थांमध्ये आदरणीय पदांवर कामे केलेली आहेत.<br>- श्री. दादासाहेबांचे अनेक नातू व नाती उच्च-शिक्षित आहेत (त्यात बरेच डॉक्टर, अभियंते, उद्योजक, आर्किटेक्ट, सल्लागार इ. आहेत) आणि भारत आणि परदेशात त्यांच्या त्यांच्या संबंधित क्षेत्रात सक्रिय आणि प्रसिद्ध आहेत, आणि दादांचा समृद्ध वारसा पुढे नेत आहेत. |

संकलन: श्री.पद्माकर सोमनाथ धुमाळ आणि निर्मल पद्माकर धुमाळ.

* * * * * *